# नियमित दिवाणी दावा क्र.३८१/१९९३ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश
# (वसंत चव्हाण विरुध्द बजरंग शेळके )
# CNR No.MHSN050000231993

१. प्रस्तुत प्रकरणातील निशाणी १४४ च्या आदेशाप्रमाणे दिनांक २३.०२.२०२४ रोजी उप अधिक्षक, भुमि अभिलेख वाळवा–इस्लामपूर यांना वाद मिळकत गट क्र.६६२ या क्षेत्राची मोजणी करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. प्रकरण तेव्हापासून अहवालासाठी प्रलंबित ठेवण्यात आले. परंतु अहवाल प्राप्त न झाल्यामुळे यापूर्वी उप अधिक्षक, भूमि अभिलेख वाळवा इस्लामपूर यांना मार्च २०२४ पासून वेळोवेळी स्मरणपत्र पाठविण्यात आली आणि मोजणीचा अहवाल किंवा मोजणीबाबतच्या स्थितीचा अहवाल मागविण्यात आला. परंतु त्यांच्याकडून कोणताही अहवाल प्राप्त झाला नाही. त्यानंतर जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांच्यामार्फत वर नमूद केल्याप्रमाणे उप अधिक्षक, भूमि अभिलेख वाळवा इस्लामपूर यांना दिनांक १७.०३.२०२५ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आले. त्यानंतर उप अधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय वाळवा इस्लामपूर यांच्याकडून पत्र निशाणी १५३ प्राप्त झाले. सदर पत्राद्वारे उप अधिक्षक, भूमि अभिलेख वाळवा इस्लामपूर कार्यालयाने खुलासा केला की, मोजणीकामी संबंधीताना पत्र पाठवून मोजणी फी भरण्याकामी आणि कागदपत्र दाखल करण्याकामी सुचित केले होते. परंतु अर्जदाराने मोजणी फी भरलेली नाही, त्याचबरोबर कागदपत्रेही सादर केली नाहीत. या कारणामुळे वाद मिळकतीची आदेशाप्रमाणे मोजणी करता आली नाही असा खुलासा मोजणी कार्यालयाने सादर केला आहे.

२.        मोजणी कार्यालयाच्या खुलाशातून स्पष्ट होते की, वादीने पुनरमोजणीचा अर्ज दिला, तो अर्ज मंजूर झाल्यावरती मोजणी होण्याकामी आवश्यक असणा–या पुर्तता केल्या नाहीत. सदर प्रकरण ३० वर्षे जुने असून त्यामध्ये द्रुतगतीने कार्यवाही होणे अपेक्षीत असताना वादीने कोणतीही कार्यवाही केली नाही आणि प्रकरण मागील चौदा महिन्यांपासून त्यामुळे प्रलंबित राहिले आहे. करीता वादीने निशाणी १४४ च्या आदेशामध्ये त्यास मोजणी फी भरुन सदर मोजणी फी भरल्याची पावती एक महिन्याच्या आत प्रकरणात दाखल करण्याबाबत आदेशीत केले तरी त्याबाबत कोणतीही पुर्तता केली नाही. त्यामुळे प्रकरण क्रम ३९ नियम ११ नुसार का निकाली काढू नये याबाबत खुलासा सादर करण्याबाबत परंतुकानुसार वादी यांना नोटीस काढण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MUKUL MADHUSUDAN CHITALE
Date: 2025.04.08 14:50:05 +0530

**इस्लामपूर.** **(मुकुल म. चितळे)**

**दिनांक –०५.०४.२०२५** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, इस्लामपूर.**